प्रधानमंत्री आवास योजनेसह प्रकल्पांसाठी जागेची मागणी

मनपाला प्रस्ताव सादर करण्याची सूचना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जागा वितरित करताना पूर्वी केलेल्या निष्काळजीपणामुळे महापालिकेचे प्रधानमंत्री घरकुल योजनेचे काम रखडले होते. आता पुन्हा या योजनेसह विविध प्रकल्पांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी महापालिकेचया वतीने करण्यात आली आहे. सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रस्ताव दाखल केल्यास १५ दिवसांत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावू, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी शंभर दिवसात महापालिकेला विविध विकास प्रकल्पांच्या कामांना मंजुरी घेण्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. त्या दृष्टीने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी बैठक घेण्यात आली. या बैठकीस मनपा प्रशासक जी. श्रीकांत, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, संतोष वाहुळे, शहर अभियंता ए. बी. देशमुख, उपायुक्त रवींद्र जोगदंड यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महापालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल बांधण्यासाठी शासनाच्या मालकीची असलेली हर्सूल गटनंबर २१६ मधील जागा मिळालेली आहे. आता गटनंबर २१५ आणि गटनंबर २१७ मधील जागा देण्यात यावी. चिकलठाणा येथील गटनंबर ४७२ मधील जागा वादग्रस्त व न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्याऐवजी कचरा प्रक्रिया प्रकल्पासमोर असलेल्या गटनंबर २३३ आणि २३६ मधील जागा देण्यात यावी. चिकलठाण्यातीलच अजिंठा फार्मा कंपनीला देण्यात आलेली जागा परत घेण्यात आल्यामुळे ही जागा मनपाला सायन्स सिटी उभारण्यासाठी मिळावी, अशी मागणी केली. विविध नागरी सोयीसुविधांचे प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने ७२ एकर जागेची आवश्यकता आहे. हर्सूल भागातील भिमटेकडीच्या खालची जागा परत घेण्यात आल्यामुळे ही जागा मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच मिटमिटा येथील गटनंबर ६५/१ मधील जागा आणि तिसगाव येथील जागा एसटीपी प्लॉन्टसाठी देण्याची मागणी प्रशासकांनी केली.

सिल्लेखानातील जागेची शाळेसाठी मागणी

सिल्लेखाना भागात कुरेशी जमातचे सामाजिक सभागृह बांधण्यात आले आहे. हे सभागृह जिल्हा प्रशासनाने दिलेल्या जागेवर असून इमारत अत्यंत मोडकळीस आली असून मनपा शाळेच्या जागेला खेटूनच ही जागा आहे. या इमारतीचा कोणताही वापर होत नसल्याने ती पाडून शाळेला खेळाच्या मैदानासाठी जागेचा वापर केला जाईल. त्यासाठी या जागेची मागणी मनपाने केली आहे.

नारेगाव, मुकुंदवाडीत कब्रस्तानसाठी जागा द्या

नारेगाव येथील जुन्या कचरा डेपोसमोर असलेली जागा आणि मुकुंदवाडी भागात कब्रस्तानसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

शिवसेनेचे कुंडलिकराव खाडे यांच्या कार्यालयावर हल्ला

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ३७६ गावांमधील राजकीय कार्यकर्ते व लागणारा पैसा राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना देऊन मदत केल्याची ध्वनिफीत समाजमाध्यमांमधून प्रसारित झाल्यानंतर शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाचे जिल्हाध्यक्ष कुंडलिकराव खाडे यांच्या कार्यालयावर हल्ला करण्यात आला. बुधवारी सायंकाळी ही घटना घडली. केवळ एवढेच नाही तर मंत्री धनंजय मुंडे यांच्या गाडीवर दगडफेक करण्याचीही चर्चा खाडे यांनी केली होती, असे समोर आल्याने बीडच्या भाजप कार्यकर्त्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची एक ध्वनिफीत प्रसारित झाली असून त्यात यामध्ये जिल्हाध्यक्ष कुंडलिक खांडे स्वतः पंकजा मुंडे यांना धोका देत राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार बजरंग सोनवणे यांना ३७६ मतदान केंद्रावर मदत केल्याचे ते सांगत आहेत. बजरंग सोनवणे यांना मदत करण्याचे सहा महिन्यांपासून आधीच हे ठरवलं होत. बजरंग सोनवणे यांनी निवडणुकीत उभे राहावे, यासाठीही प्रयत्न केले होते. पहिल्यांदाच राजकीय जीवनात पंकजा मुंडे यांना असा धोका दिला आहे, असेही खांडे यांनी कबूल केले. समाज माध्यमांमध्ये ध्वनिफीत प्रसारित झाल्यानंतर काही तरुणांनी खांडे यांच्या कार्यालयावर हल्ला केला.

घरकुलाचा दोन वेळा लाभ, ग्रामपंचायत महिला सदस्य अपात्र

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : एक घरकुल मंजूर झालेले असताना पुन्हा त्याच जागी नवीन घरकुल घेतल्याप्रकरणी पूर्णा तालुक्यातील पिंपळगाव सारंगी येथील ग्रामपंचायतच्या महिला सदस्याचे पद जिल्हाधिकारी यांनी अपात्र ठरविले आहे. दिगंबर साखरे यांनी केलेल्या अर्जावर हा निर्णय देण्यात आला आहे.

पिंपळगाव सारंगी येथील ग्रा.पं. सदस्या रुक्मिणी उमाजी आगलावे यांनी मालमत्ता क्र. २५ मध्ये सन २२ - २३ मध्ये शासनाच्या घरकुल योजनेसाठी ग्रामपंचायतीमार्फत प्रस्ताव सादर केला होता. सोबत नमुना क्र. ८ चा प्रस्ताव जोडला होता. तो प्रस्ताव मंजूर होऊन रुक्मिणी आगलावे यांना १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता देखील प्राप्त झाला. मात्र तत्पूर्वी महिलेचे पती उमाजी आगलावे यांच्या नावे याच मालमत्ता क्र. २५ वर सन २०१४-१५ मध्ये घरकुल बांधकाम करुन ९५ हजाराचे शासन अनुदान उचलण्यात आले होते. याबाबत दिगंबर साखरे यांनी ग्रा.पं. सदस्या रुक्मिणी आगलावे आणि त्यांच्या पतीने एकाच मालमत्ता क्रमांकावर घरकुल योजनेचा दोनदा लाभ घेतल्यामुळे त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत अर्ज केला होता. या अर्जावर जिल्हाधिकारी यांनी ग्रा.पं. सदस आगलावे यांनी पदाचा दुरुपयोग करुन शासनाची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले म्हणून त्यांचे सदस्यत्व बाद करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, 'ज्ञानतीर्थ' परिसर, विष्णुपुरी, नांदेड.

जाहीर प्रगटन

' शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अतिरिक्त जलदगती तुकडी बाबत सूचना'

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्यशी संलग्नित महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (८) अन्वेय महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१७/ (१२८/१७)/ मशि-४, दि.०४ जुलै, २०१७ नुसार अतिरिक्त जलदगती तुकडीबाबत निकष व कार्यपद्धती निश्चित केलेली आहे. निकषास पात्र असलेल्या महाविद्यालयांनी याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव दि.०४/०७/२०२४ पर्यंत ०३ (तीन) प्रतीमध्ये आवश्यक शुल्कासह विद्यापीठात सादर करावेत. सदर जाहीर प्रगटन, शासन निर्णय व अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संदर्भ क्र.: शैक्षणिक/संलग्न/२०२४-२५/७४

दि.२५.०६.२०२४ कुलसचिव

IDBI BANK आयडीबीआय बँक लि. झोनल ऑफिस सालासर प्रेस्टीज, पहिला मजला प्लॉट नं. 1/ए, डब्लुएचसी रोड, धरमपेठ, नागपूर 440010, **विक्री सुचना**

शुध्दीपत्रक

पंकज जिनिंग अँड प्रेसिंग च्या बाबतीत IDBI बँकेने दिनांक 25.06.2024 रोजी इंडियन एक्सप्रेस आणि लोकसत्ता मध्ये ई-लिलाव विक्री सूचना प्रकाशित केली होती, ज्यामध्ये ई-लिलावाची तारीख '20-07-2024' अशी नमूद केली होती ती '29-07-2024' म्हणून वाचण्यात यावी. **अशा प्रकारे, उपरोक्त प्रकरणात 29-07-2024 रोजी ई-लिलाव आयोजित केला जाईल** बाकी सर्व अटी व शर्ती आणि उक्त सूचनेतील मजकूर अपरिवर्तित राहील.

ठिकाण : नागपूर
दि. 28.06.2024

सही /-
अधिकृत अधिकारी
आयडीबीआय बँक लिमिटेड

SBI संभाव्य अलाभकारी मालमत्ता वसुली शाखा (सार्ब), छत्रपती संभाजीनगर
प्लॉट नं.१, सिडको टाऊन सेंटर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००३

(अचल मालमत्तेसाठी) **ताबा सूचना** [नियम-८(१)]

ज्या अर्थी खालील सही करणार **भारतीय स्टेट बँक, सार्ब, औरंगाबाद** यांचे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील कायद्याचे नियम ३ सह वाचले जाणारे कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कर्जदार **मे.श्रद्धा ट्रेडींग कंपनी** यांना **दि.३१/०३/२०२४** रोजी मागणी सूचना पाठवुन त्यांनी सुचनेत नमुद दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंतची रक्कम **रू.५६,१३,८४५.००** (रू.छप्पन्न लाख तेरा हजार आठशे पंचेचाळीस केवळ) अधिक दि.०१/०४/२०२४ पासुनचे पुढील व्याज व इतर शुल्क हे त्यांना नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांचे आंत भरणेस कळविले होते.

उपरोक्त नोटीसप्रमाणे मागणी केलेली रक्कम मुदतीत भरण्यास कर्जदार यांनी कसूर केलेली आहे, त्या अर्थी, कर्जदार व तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचा उपरोक्त कायद्याचे नियम ८ सह वाचले जाणारे कलम १३(४) अन्वये दिनांक **२४ जून, २०२४** रोजी ताबा घेतला आहे.

सबब विशेषत: कर्जदार व तमाम जनतेस सावध करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या संपत्तीबाबत कोणीही, कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपर कोणीही सदरील संपत्तीबाबत व्यवहार केल्यास तो व्यवहार **भारतीय स्टेट बँक,** यांचा दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंतची रक्कम **रू.५६,१३,८४५.००** (रू.छप्पन्न लाख तेरा हजार आठशे पंचेचाळीस केवळ) अधिक दि.०१/०४/२०२४ पासूनचे व्याज, दंड व खर्चाच्या बोजासहीत असेल.

संरक्षीत मालमत्तेच्या मुक्ततेसाठी असलेल्या उपरोक्त कायद्यामधील कलम १३ चे उपकलम (८) मधील तरतुदीमधे उपलब्ध असलेल्या वेळेसाठी कर्जदार/जामीनदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण

श्री.मारोती पुंडलिकराव कोटगिरे यांचे मालकीचा प्लॉट क्र. ५१/पी, मनपा घर क्र.ई-९३, कोटगिरे निवास, फुले नगर, नयी आबादी, गणेश मंदिर जवळ, अहमदपुर, जि.लातूर-४१३५१५, प्लॉट क्षेत्रफळ १७५० चौ.मी. आणि त्यावरील बांधकामासहीत, ज्याची चतु:सिमा.

पूर्वेस : वळसे व मोरे प्लॉट क्र.५१(पी)
पश्चिमेस : माधव घोगरे यांचा प्लॉट
उत्तरेस : नानासाहेब देशमुख यांचे घर
दक्षिणेस : रस्ता

ठिकाण : अहमदपुर, लातूर
दिनांक : २४/०६/२०२४
(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

सही/-
प्राधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक (सार्ब), छ.संभाजीनगर

SHREE

OMKARA **ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : नं. ९, एम. पी. नगर, फर्स्ट स्ट्रीट, कोंगू नगर एक्स्टेन्शन, तिरुपूर-६४१ ६०७.
कॉर्पोरेट कार्यालय : कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८. टेलि. : ०२२-६९२३ ११११/९७६९१७०७७४.

[परिशिष्ट-IV-ए] [रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा]

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून **संतोष गंगाराम राठोड (ऋणको), दीपा संतोष राठोड (सह-ऋणको, मेवाड भवन शुद्ध शाकाहारी भोजनालय (सह-ऋणको)** यांना सूचना देण्यात येते की, याखालील वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ताब्यात आहे आणि जिचा ताबा **३०.०५.२०२२** रोजी ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओएआरपीएल), सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री वर नमूद केलेले ऋणको व सह-ऋणकोकडील **मेसर्स ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड** सुरक्षित धनकोकरिता देय **०१.१२.२०२०** पासून पुढील व्याजासह एकत्रित **३०.११.२०२० रोजीप्रमाणे रु. २१,८३,१५२/- (रुपये एकवीस लाख त्र्याऐंशी हजार एकशे बावन्न फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता **०१.०८.२०२४ रोजी दु. १२.०० व दु. ०१.०० दरम्यान** (बोलीच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ **३१.०७.२०२४ रोजी सायं. ०६.०० वा.**पर्यंत आहे) **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही आधाराशिवाय''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. ने (ओमकारा पीएस २२/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली) फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेडकडून अंतर्निहित सुरक्षेसह दिनांकित २६.०२.२०२१ अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा पूर्वोक्त ऋणको/ हमीदारांनुसार असलेले संपूर्ण थकीत ऋण प्राप्त केले आहेत.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव आणि ज्ञात भार (जर असल्यास) खालीलप्रमाणे आहेत :

मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत	इरठे
पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- **फ्लॅट नं. ०२,** पहिला मजला, प्लॉट नं. ५८, गट नं. २६, 'कृपाश्री अपार्टमेन्ट्स', इटखेडा पैठण रोड, औरंगाबाद-४३१ ००१, मोजमापाचा एरिया २८८ चौ.मी. **पुढीलप्रमाणे सीमित :** पूर्व : खुली जमीन, पश्चिम : फ्लॅट नं. ३, उत्तर : साइड, दक्षिण : रोड.	रु. २२,००,०००/-	रु. २,२०,०००/-

ई-लिलावाची तारीख	०१.०८.२०२४ रोजी दु. ०१.०० वा. ते दु. ०२.००
किमान बोलीवृद्धी रक्कम	रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त)
सहभागाचे बोली पत्र/ केवायसी कागदपत्रे/ इरठेचा पुरावा इ. सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ	३१.०७.२०२४ रोजी सायं. ०६.००वा.पर्यंत.
पाहणीची तारीख	२२.०७.२०२४ रोजी दु. १२.०० व दु. ०२.०० दरम्यान (केवळ भेटीची पूर्ववेळ निश्चित करून)
ज्ञात दायित्वे	ज्ञात नाहीत

ही प्रसिद्धी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) अंतर्गत पूर्वोक्त ऋणको/ सह-ऋणकोंकरिता **'तीस दिवसीय'** नोटीससुद्धा आहे.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया http://omkaraarc.com/auction.php या सुरक्षित धनकोंच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहा आणि सविस्तर माहितीकरिता प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा: तानाजी मांडावकर: ९७६९१७०७७४ व ई-मेल: tanaji@omkaraarc.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटलासुद्धा भेट देऊ शकतील किंवा सेवा-पुरवठाकार मेसर्स सी-१ इंडिया प्रा. लि., टेलि. हेल्पलाइन: +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पंड्या, मोबाइल: ८८६६६ ८२९३७, ई-मेल: Maharashtra@c1india.com यांच्याशी संपर्क साधू शकतील. स्वारस्य असलेले बोलीदार इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्ट्सी कोड २०१६च्या सेक्शन २९ए अंतर्गत प्रतिज्ञापत्र देतील व अनुपालन करतील.

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २६.०६.२०२४ ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.करिता
स्थळ : मुंबई (ओमकारा पीएस २२/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)

---

kotak **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नं. : एल६५११०एमएच१९८५पीएलसी०३८१३७
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी२७, "जी" ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र.
प्रादेशिक कार्यालय : कोटक महिंद्रा बँक लिमिटेड, ४था मजला, न्याती युनिट्री, नगर रोड, येरवडा, पुणे-४११ ००६, महाराष्ट्र

लिलाव-नि-विक्रीकरिता जाहीर सूचना

कृपया ही नवीन सूचना समजण्यात यावी, जी याद्वारा **आम जनतेस** आणि विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको हमीदारांना देण्यात येत आहे की, "**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**"च्या **प्राधिकृत अधिकारीं**कडे गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** "**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**"च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री "**जसे आहे जेथे आहे**","**जसे आहे जे काही आहे**" आणि "**जे काही आहे तेथे आहे**" या तत्त्वावर करण्यात येणार आहे. प्रस्ताव स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता, जिचा तपशील याखाली देण्यात आला आहे, निम्नस्वाक्षरीकारांद्वारा आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार, **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** म्हणजेच **www.c1india.com** या वेब पोर्टलद्वारा ऑनलाईन सादर करण्याकरिता मागविण्यात आले आहेत. विक्रीकरिता असलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील याखाली देण्यात आला आहे :

लोन अका. नं.	**आरएचबी१४५३८२, आरएचबी७६६५६१, आरएचबी१८१६२४**
ऋणको/ हमीदार/ गहाणकाराचे नाव	**ज्ञानेश्वर गणपतराव टर्टे, संगिताबाई ज्ञानेश्वर टर्टे, स्वामी समर्थ एन्टरप्रायझेस**
मागणी सूचना तारीख व रक्कम [१३(२) सूचना तारीख व रक्कम]	**१९.१०.२०१८ व रु. ३१,७७,८८९.१४/- (रुपये एकतीस लाख सत्याहत्तर हजार आठशे एकोणनव्वद व पैसे चौदा फक्त) १९ ऑक्टोबर २०१८** रोजी प्रमाणे

मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत (रु.'त)	इसारा रक्कम ठेव (रु.'त)
फ्लॅट नं. ०६, व्यंकटेश अपार्टमेंट, प्लॉट नं. ३६, गट नं. १८८ वरील, मौजे हर्सूल, ता. व जि. औरंगाबाद. **पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे :** धारण केलेला फ्लॅट नं. ०६, व्यंकटेश अपार्टमेंट, प्लॉट नं. ३६, गट नं. १८८ वरील, मौजे हर्सूल, ता. व जि. औरंगाबाद.	**रु. ३१,५०,०००/- (रुपये एकतीस लाख पन्नास हजार फक्त)**	**रु. ३,१५,०००/- (रुपये तीन लाख पंधरा हजार फक्त)**

स्थावर मालमत्तेच्या पाहाणीची तारीख	लिलावाची तारीख व वेळ
०५ जुलै, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.००	१५ जुलै, २०२४ रोजी दु.०२.०० ते दु.०३.००
बोली वृद्धी रक्कम	**प्रस्ताव/ इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख**
रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त)	१२.०७.२०२४ रोजी सायं ०५.०० वा. पर्यंत

विक्रीच्या महत्त्वाच्या शर्ती व अटी :

(१) लिलावाचे आयोजन बोली कागदपत्रांच्या पुढील **शर्ती व अटीं**च्या अनुसार व त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार करण्यात आले आहे. बोलीदार बोली कागदपत्रे, ई-लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या सुरक्षित मत्तेचा सविस्तर तपशील आणि बोली प्रपत्रे, जी ऑनलाईन सादर करण्यात येणार आहेत, याकरिता आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार, **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** म्हणजेच **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटला भेट देऊ शकतील; (२) सर्व इच्छुक खरीददार/ बोलीदारांनी व नमूद केल्यानुसार **https://www.bankeauctions.com** या वेब पोर्टलवर त्यांच्या नावांची नोंद करणे आवश्यक आहे आणि पूर्वोक्त तारीख व वेळेत ई-लिलावामध्ये स्वतः सहभागी होण्याकरिता विनामूल्य युजर आयडी व पासवर्डची निर्मिती करावी; (३) कोणतीही चौकशी, माहिती, सहाय्य, प्रक्रिया आणि ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण याकरिता भावी बोलीदार संपर्क साधू शकतील :- **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार विभाग - **श्री. विनोद चौहान, टेलि क्र. :** +९१ ७२९११९७११२४, २५, २६, **मोबा.नं. : ९८१३८८७९३१ व ईमेल आयडी : delhi@c1india.com** द्वारा **व support@bankeauctions.com**; (४) प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार मालमत्तेवर तेथे कोणताही भार नाही. तथापि, स्वारस्य असलेले बोलीदार वर नमूद केल्यानुसार किंवा भेटीची पूर्व-वेळ ठरवून अन्य कोणत्याही तारखेस व वेळेत मालमत्ता व तिच्या कागदपत्रांची पाहाणी करू शकतील आणि ते त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी भार, ई-लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे/ हक्क/ देणी याबाबत त्यांनी स्वतः स्वतंत्र चौकशी करावी.

ई-लिलाव जाहीरात "**केएमबीएल**"शी कोणतीही बांधिलकी किंवा कोणतेही प्रतिनिधीत्व करीत आहे असा अर्थबोध होत नाही. मालमत्तेची विक्री "**केएमबीएल**"ला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारासह करण्यात येत आहे. **प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको** त्रयस्थ व्यक्तीचे दावे/ हक्क/ देणी याकरिता कोणत्याही परिस्थितीत जबाबदार असणार नाहीत; (५) ई-लिलावात भाग घेण्याकरिता स्वारस्य असलेले खरीददार/ बोलीदारांना वर विनिर्दिष्ट केल्यानुसार **पॅन कार्ड, आधार कार्ड, निवासी पत्त्याचा पुरावा,** कंपनी असल्यास **बोर्ड रिझोल्यूशन्स** आणि पत्ता याच्या स्वयं-साक्षांकित प्रतींसह **पुणे** येथे देय "**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**"च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेच्या व्याज-मुक्त परतावा इसारा रक्कम ठेवीच्या (**इरठे**) प्रदानाचा तपशील वेब पोर्टलमध्ये (**https://www.bankeauctions.com**) सादर करावा लागणार आहे/ अपलोड करावा लागणार आहे.

ऋणको/ गहाणकार / हमीदारांना याद्वारा या सूचनेच्या तारखेपासून **पंधरा दिवसां**च्या आत आत्तापर्यंतचे व्याज व खर्चासह वर नमूद केल्यानुसार देणींचे प्रदान आणि दायित्व पूर्णतः सोडविण्याकरिता **सरफेसी ॲक्टच्या रुल ६ (२), ८ (६) व ९ (१) अंतर्गत १५ दिवसीय सूचना** देण्यात आली आहे, त्यास असमर्थ ठरल्यास वर नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेची विक्री करण्यात येणार आहे. जर इंग्लीश व स्थानिक वृत्तपत्रातील विक्री सूचनेच्या प्रसिद्धी दरम्यान कोणतीही विसंगती आढळून आल्यास स्थानिक वृत्तपत्रातील जाहीरातीऐवजी इंग्लीश वृत्तपत्रातील जाहिरात ग्राह्य धरावी आणि ती अंतिम प्रत म्हणून विचारात घेण्यात येईल, अशाप्रकारे अर्थाबाबत संदिग्धता काढून टाकली जाईल. जर ऋणको/ हमीदार/ गहाणकार बँकेला विक्रीच्या तारखेपूर्वी संपूर्ण देणींचे प्रदान करीत असल्यास, लिलाव स्थगित करण्यात येईल.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **https://www.kotak.com/en/bank-auctions.hyml** या आमच्या कार्यालयीन वेबसाइटला भेट द्यावी किंवा वर नमूद केलेल्या बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाकडील **प्राधिकृत अधिकारी श्रीमती श्वेता कामथ, ईमेल आयडी : Shweta.Kamath@kotak.com किंवा प्रतिनिधी ईस्माइल देशमुख @ ८७६७४३८२५३, ईमेल आयडी : ismail.deshmukh@kotak.com व श्री. अशोक मोटवानी @ ९८७३३७३३५१, ईमेल आयडी : ashok.motwani@kotak.com** यांच्याशी संपर्क साधावा.

विशेष सूचना :- ई-लिलावाचे आयोजन "**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**"च्या ("**केएमबीएल**") वतीने आमचे सेवा-पुरवठाकार **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** द्वारा पूर्व-विनिर्दिष्ट तारखेस, जेव्हा बोलीदार वरील राखीव किमतीच्या त्यांच्या निवडीच्या अनुसार त्यांच्या बोलींचे ठिकाण/ कार्यालये/ त्यांचे स्वतःच्या घराकडून दरपत्रके उदधृत करतील, केले जाणार आहे. इंटरनेट कनेक्टिव्हिटी व अन्य आवश्यक साहीत्य याबाबत बोलीदारांनी स्वतः खात्री करून घ्यावयाची आहे. कृपया नोंद घ्यावी की इंटरनेट कनेक्टिव्हिटी फेल्युअर (**जे काही असेल त्या कारणास्तव**) याकरिता बोलीदार एकमेव जबाबदार असतील आणि "**केएमबीएल**" किंवा **मेसर्स सी१ इंडिया प्रा.लि.** अशा अनपेक्षित परिस्थितीकरिता जबाबदार असणार नाहीत. अशा बिकट परिस्थितीवर मात करण्याकरिता बोलीदारांनी सर्व आवश्यक व्यवस्था/ पर्यायी व्यवस्था, ज्या काही आवश्यक असतील त्या, कराव्यात जेणे करून ते अशा परिस्थितीवर मात करू शकतील आणि ई-लिलावात यशस्वीरित्या सहभागी होण्यात ते सक्षम होतील. तथापी, बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी अशा जटिल समस्या टाळण्याकरिता शेवटच्या क्षणी त्याच्या/ तिच्या बोली उदधृत करणे/ त्यात वाढ करणे याकरिता वाट पाहू नये.

स्थळ : पुणे, महाराष्ट्र
तारीख : २८.०६.२०२४

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकरिता

---

shubham **शुभम हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कं. लि.**
कॉर्पोरेट कार्यालय : ४२५, उद्योग विहार फेज IV, गुरगाव-१२२ ०१५ (हरयाणा)
फोन : ०१२४-४२१२५३०/३१/३२, ई-मेल : customercare@shubham.co वेबसाइट : www.shubham.co

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२च्या सेक्शन १३(२) (यापुढे ''कायदा'' म्हणून संबोधित) अंतर्गत सूचना

तुमच्या लक्षात आणून देत आहोत की, तुमचे कर्ज खाते सुरक्षित धनको **शुभम हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कंपनी लिमिटेड,** तिचे नोंदणीकृत कार्यालय येथे असलेले- ६०८-६०९, ६वा मजला, ब्लॉक-सी, अन्सल इम्पीरियल टॉवर, कम्युनिटी सेन्टर, नारायणा विहार, नवी दिल्ली-११००२८ (यापुढे ''एसएचडीएफसीएल'' म्हणून संबोधित) यांच्याद्वारा ''एनपीए'' म्हणून घोषित केले आहे आणि तुम्ही ''एसएचडीएफसीएल''ला तुमच्या कर्जानुसार एकूण थकीत रक्कम प्रदान करण्यास पात्र आहात. तुम्ही आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित पूर्वोक्त रकमेवरील संविदात्मक दरात पुढील व्याजाचे प्रदान करण्याससुद्धा पात्र आहात. त्यामुळे आम्ही याद्वारा तुम्हास फर्मावीत आहोत की, तुम्ही या सूचनेच्या तारखेपासून **६० दिवसांच्या आत** ''एसएचडीएफसीएल''कडील तुमचे संपूर्ण दायित्व सोडवावे, त्यास असमर्थ ठरल्यास ''एसएचडीएफसीएल'' कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत अधिकारांची अंमलबजावणी करील. ऋणको आणि सुरक्षित मत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

अ. क्र.	लोन नं. / ऋणकोचे नाव	अर्जदाराचा पत्ता	मागणी सूचनेची तारीख व रक्कम	सुरक्षित मत्ता
1	Loan No.0NND2012000005032352, बाळासाहेब पंडितराव जानकर, पुण्यरथा पंडितराव जानकर, पंडितराव नारायणराव जानकर	द्वारा- नामदेव अदभाने वाघजी, महाकाली मंदिराजवळ, नांदेड-४३१ ६०२, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 8,02,529/-	जीपी मालमत्ता क्र. ७७, वाघी, ता. व जि. नांदेड-४३१ ६०२, महाराष्ट्र
2	Loan No.0LAT2204000005046592, गुणवंतराव रावसाहेब जाधव, संगीता गुणवंतराव जाधव	निर्पणा पट्टवडगाव, हनुमान मंदिराजवळ, ता. आंबेजोगाई, जि. बीड-४३१ ५१९, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 6,20,703/-	जीपीएच नं. २०७, ॲट मौजे निर्पाना, संत माधवबाबा टेम्पलजवळ, ता. अंबेजोगाई, जि. बीड-४३१ ५१९, महाराष्ट्र
3	Loan No.0AGN2211000005054396, फारुकी लैलूनिहार, अमिनउद्दिन इफ्तेकारउद्दिन काझी	फ्लॅट नं. ८, तिसरा मजला, मार्यल रेसिडेन्सी, खास्स अगेट नागसेन कॉलनी, जिन्सी पोलीस स्टेशन, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 26,24,915/-	सीटीएस नं. ११६३२, शीट नं. ३२९, अल्साबा किराणा स्टोअरजवळ, शरीफ कॉलनी, किराडपुरा, हाऊस नं. ४-११-६८/पी, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र
4	Loan No.0AGN2308000005067911, रझियासुल्ताना नझिम खान, नझिमखान इस्माईल खान	फ्लॅट नं. १२, चिनार गार्डन, दुसरा मजला, पडेगाव, टोल नाक्याजवळ, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 9,42,442/-	फ्लॅट नं. बी-१२, दुसऱ्या मजल्यावरील, बी-टाइप बिल्डिंग, गट नं. ६ पार्ट, प्लॉट नं. ३१ ते ३५, चिनार गार्डन अपार्टमेन्ट्स, विकासपुरी जयसिंहपुरा, ता. व जि. औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र
5	Loan No.0LAT2207000005049897, ज्ञानेश्वर अंकुशराव जगदाळे, विद्या ज्ञानेश्वर जगदाळे	ॲट पोस्ट पोहरेगाव, ता. रेणापूर, जि. लातूर-४१३ ५१३, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 28,94,145/-	जीपीएच नं. १०८, ॲट व्हिलेज (इटी), ता. रेणापूर, जि. लातूर-४१३ ५१३, महाराष्ट्र
6	Loan No. 0AGN2111000005041120, सुनीता मनोहर गाटला, विजयलक्ष्मी गंगाधर गाटला, गाटला मनोहर, पद्मा नरसिंहराव कुद्दूरी, महेश गंगाधर गाटला, नितेश गंगाधर गाटला	गट नं. ७७, प्लॉट नं. ६८, राम मंदिर, संतोष नगर, सातारा परिसर, राम मंदिर, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 10,12,100/-	मिळकत नं. ७४९०, प्लॉट नं. ६८, गट नं. ७७, सातारा, जि. औरंगाबाद-४३१ ००५, महाराष्ट्र
7	Loan No. NAS_1509_045403, भगवान शांताराम कुंवर, ममता भगवान कुंवर	रूम नं. ९, गजानन रो हाऊस, सातपूर, नाशिक-४२२ ००७, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 6,11,702/-	फ्लॅट नं. ४, दुसरा मजला, शिवशंकर अपार्टमेन्ट, प्लॉट नं. ४८, जी नं. १९७/३ए बी/एच पार्ट एच पॅलेस, केदार नगरच्या पुढे, श्रमिक, नाशिक-४२२ ००७, महाराष्ट्र
8	Loan No. 0AGN1710000005008465, वामन सदाशिव शेजूळ, कमळाबाई वामन शेजूळ	प्लॉट नं. १९ २० २१ सी-७, गट नं. ८८, एकता रेसिडेन्सी, हायकोर्ट कॉलनीजवळ, सातारा, महादेव मंदिराच्या मागे, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 4,49,550/-	मिळकत नं. ८२३१/१, रो हाऊस नं. सी-७, प्लॉट नं. १९, २०, २१, गट नं. ८८, एकता रेसिडेन्सी, हायकोर्ट कॉलनीजवळ, महादेव मंदिराजवळ, गाव रोड, मौजे सातारा, ता. व जि. औरंगाबाद-४३१ ००८, महाराष्ट्र
9	Loan No.0AGN1807000005013990, अन्वर अमिर शेख, समिना अमिर शेख	मिळकत नं. ४२३/२, कराडी, तुर्काबाद, ता. गंगापूर, मदिना मस्जिद, औरंगाबाद-४३१ १०९, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 5,17,865/-	मिळकत नं. ४२३/२, कराडी तुर्काबाद, ता. गंगापूर, मदिना मस्जिद, औरंगाबाद-४३१ १०९, महाराष्ट्र
10	Loan No.0SRM1811000005015875, उज्ज्वला गंगाराम भराडे, गंगाराम जगन्नाथ भराडे	गट नं. २२५ मधील, गावठण मिळकत नं. ३४७, गावठण व्हिलेज बजाठाण, ता. वैजापूर, औरंगाबाद-४३१ ७०१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 6,96,306/-	मिळकत नं. ३४७, गॅट नं. २२५, आनंद किराणाजवळ, एपी बजाठाण, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद-४३१ ७०१, महाराष्ट्र
11	Loan No. 0AGN2008000005028977, सचिन बाळू पालवे, अनिता अरविंद पालवे, अरविंद साहेबराव पालवे	प्लॉट नं. ४१९, गट नं. १६२, साऊथ सिटी सिडको महानगर २, ग्रीन लॅण्ड स्पायसेस फ्रेश, औरंगाबाद-४३१ १३६, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 14,88,992/-	प्लॉट नं. ४१९-डी, उत्तरेकडील पोर्शन, गट नं. ११६/पार्ट, तिसगाव, ता. व जि. औरंगाबाद-४३१ १३६, महाराष्ट्र
12	Loan No. 0NAS1801000005010720, अझर फारूक शेख- विधि वारसदार- दिवंगत श्री. फारूक बशिर शेख यांचे सुपुत्र, शाहरूख फारूक शेख- विधि वारसदार- दिवंगत श्री. फारूक बशिर शेख यांचे सुपुत्र, नसरीनबानो फारूक शेख- विधि वारसदार- दिवंगत श्री. फारूक बशिर शेख यांची पत्नी, अझर फारूक शेख, शाहरूख फारूक शेख, नसरीनबानो फारूक शेख	फारक बिल्डिंग, पोलीस चौकीजवळ, खडकली, नाशिक-४२२ ००१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 52,79,459/-	रेसिडेन्शियल + कमर्शियल बिल्डिंग तळमजला + तिसरा मजला, सर्व्हे नं. १८८६ बी, हाऊस नं. १३१३/००२, गंजमाल सिग्नलजवळ, जीपीओ रोड, नाशिक, गावठण, ता. व जि. नाशिक-४२२ ००१, महाराष्ट्र
13	Loan No.0DHU1802000005011036 & 0DHU2203000005045480, भागवत संजय माळी, सरला श्रीराम माळी, श्रीराम धोंडू माळी	ॲट पोस्ट कापडाने लोन खेडा, ता. व जि. धुळे, भवानी चौकाजवळ, धुळे-४२४ ३०७, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 6,72,561/- & ₹ 34,121/-	जीपीएच नं. २५१५, कामगार नगर, कापडने ग्रामपंचायत, ता. व जि. धुळे-४२४ ३०७, महाराष्ट्र
14	Loan No.0DHU1903000005019010 & 0DHU2203000005045356, सुनील पारसमल जैन, मयुर सुनील जैन, सुनीता सुनील जैन	ॲट पोस्ट फगाणे, ता. व जि. धुळे-४२४ ३०१, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 14,59,896/- & ₹ 57,711/-	प्लॉट नं. ८, सर्व्हे नं. ५४६/४ यापैकी, विकास कॉलनी, बाफना पेट्रोलियमच्या मागे, येथे स्थित- फगाने, ता. व जि. धुळे-४२४ ३०१, महाराष्ट्र
15	Loan No. 0KAL2107000005037469 & 0KAL1809000005015097, यशवंत हरी ढाके, शीतल यशवंत ढाके	११९, ॲट पोस्ट खर्डी बुद्रुक, ता. रावीर, जि. जळगाव, मराठी स्कूल, जळगाव-४२५ ५०७, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 1,27,150/- & ₹ 13,63,573/-	फ्लॅट नं. १०६, पहिला मजला, गणेश दर्शन, गॅट नं. २६७, सर्व्हे नं. १२४, हिस्सा नं. १, प्लॉट नं. १० व ११, व्हिलेज वांगणी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१ ५०३, महाराष्ट्र
16	Loan No.0KAL1610000005002761, उमेश सोनावणे, दीपा सोनावणे	१३, सी-१/१२, भारत नगर, हर्सूल रोड, हडको, औरंगाबाद-४३१ ००३, महाराष्ट्र	21-06-2024 & ₹ 12,94,964/-	फ्लॅट नं. ३०६, तिसरा मजला, जय महाराष्ट्र सोसायटी, सद्गुरू ग्राऊण्ड, हाऊस नं. २०/०३०७, प्रॉपर्टी नं. जीएचए, ००२०-०३०७, गणेश नगर, ग्रामीण बँकसमोर, घणसोली, नवी मुंबई-४०० ७०१, महाराष्ट्र

स्थळ : गुरगाव
तारीख : २७.०६.२०२४

प्राधिकृत अधिकारी
शुभम हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कंपनी लिमिटेड

ADITYA BIRLA CAPITAL **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात - ३६१२६६
शाखा कार्यालय : जी-कॉर्प टेक पार्क, ८वा मजला, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे-४००६०१ (महाराष्ट्र)

मागणी सूचना (सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३ (१) अंतर्गत)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेची पर्यायी सेवा

याखाली नमूद केलेल्या ऋणकोंकरिता याद्वारा सूचना देण्यात येते की, त्यांनी **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**कडून ("**एबीएचएफएल**") त्यांच्या द्वारा लाभ घेण्यात आलेल्या पत सुविधेच्या परतफेडीत कसूर दाखविली आहे, त्यांच्या कर्ज खात्यांचे त्याकरिता भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुत्रांच्या अनुसार कंपनीच्या बुक्समध्ये **नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स** म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर, "एबीएचएफएल"ने त्यांच्यावर फर्माविणाऱ्या त्यायोगे उक्त ऋणकोंच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यांवर सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या (सरफेसी कायदा) सेक्शन १३(२) अंतर्गत **मागणी सूचना** निर्गमित केल्या आहेत आणि उक्त मागणी सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार पूर्वोक्त रक्कम व आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह संविदात्मक दरातील पुढील व्याजासह एकत्रित संपूर्ण **थकित रकमे**ची परतफेड करण्याकरिता त्यांच्याकडून मागणी केलेली आहे. तथापी, मागणी सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या (सरफेसी रुल्स) रुल ३ नुसार या प्रसिद्धीद्वारासुद्धा देण्यात येत आहे.

अनु. क्र.	ऋणको/ सह-ऋणको व हमीदार/ सह-हमीदाराचे नाव व पत्ता व कर्ज खाते क्र.	एनपीए तारीख	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचनेनुसार/ तारखेनुसार देय रक्कम
१	**१. शबाना रफिक चौधरी**, फ्लॅट नं. ०९, पहिला मजला, हाऊसिंग सोसायटी लि., सी.टी.एस. नं. ६६६७/१ व ६६६७/२, शीट नं. २२, किले आर्क. सफा कॉम्प्लेक्स हुमा फ्लॅट ओनर्स को-ऑप.हाऊ. सोसा. लि., ईस्लामिक रिसर्च सेंटरजवळ, एज्युकेशन अँड वेल्फेअर रिसर्च, औरंगाबाद -४३१००१, महाराष्ट्र. **२. रफिक हरुन चौधरी मणियार**, फ्लॅट नं. ०९, पहिला मजला, हाऊसिंग सोसायटी लि., सी.टी.एस. नं. ६६६७/१ व ६६६७/२, शीट नं. २२, किले आर्क. सफा कॉम्प्लेक्स हुमा फ्लॅट ओनर्स को-ऑप. सोसा., ईस्लामिक रिसर्च सेंटरजवळ, एज्युकेशन अँड वेल्फेअर रिसर्च, औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र. **३. रफिक हरुन चौधरी मणियार**, हाऊस नं. ५-२-१०२, पानचक्की, पेस कॉलेज जवळ, औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र. **४. शबाना रफिक चौधरी**, हाऊस नं. ५-२-१०२, पानचक्की, पेस कॉलेज जवळ, औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र. **५. शबाना रफिक चौधरी**, द्वारा - झोया बँगल्स स्टोअर्स, एच. एन. ५/१२/३, भीम नगर, एन.एच. ६ जवळ, भाऊसिंगपुरा, औरंगाबाद- ४३१००१, महाराष्ट्र. **६. रफिक हरुन चौधरी मणियार**, द्वारा - हिना बँगल्स स्टोअर्स, भीम नगर, भाऊसिंगपुरा, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र. **कर्ज खाते क्र. : एलएनएयूआर०एचएल-०३१९००२२०५६ व एलएनएयूआर०एचएल-०४१९००२२४८९**	१४.०७.२०२१	**२४.०६.२०२४ जुना सूचना दिनांकित १९.०७.२०२१ मागे घेतली. ही प्रसिद्धी प्रभावी नोटीस म्हणून समजण्यात यावी.**	रु. ४८,५३,६७१/- (रुपये अठ्ठेचाळीस लाख त्रेपन्न हजार सहाशे एकाहत्तर फक्त) थकित मुद्दल, थकित रक्कम द्वारा (निघालेला विलंब आकार समाविष्ट) आणि २४.०६.२०२४ पर्यंत व्याज

गहाण असलेल्या मालमत्तेचे/ स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : फ्लॅट नं. ०९, मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ७६० चौ.फू., पहिल्या मजल्यावरील, सफा कॉम्प्लेक्स, हुमा फ्लॅट ओनर्स को-ऑप. हाऊ. सोसा. लि., सी.टी.एस. नं. ६६६७/१ व ६६६७/२, शीट नं. २२, किले आर्क. हर्ष नगर, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र आणि पुढीलप्रमाणे सिमित : **पूर्व** : ५० फू. रोड, **पश्चिम** : फ्लॅट नं. ०८, **उत्तर** : आकाशाच्या दिशेने खुले, **दक्षिण** : आकाशाच्या दिशेने खुले.

आम्ही याद्वारा यामध्ये नमूद केलेल्या ऋणकोंना फर्मावित आहोत की त्याकरिता किंमत, आकार, खर्च, इ. अधिक त्यावरील पुढील व्याजासह एकत्रित थकित रक्कम या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत आम्हास प्रदान करावी, त्यास असमर्थ ठरल्यास आम्हास अंतर्भूत सुरक्षा हित लागू करण्यास परंतु ताबा घेण्यास मर्यादित नसलेले व किंमत व परिणाम यानुसार तुमच्या जोखीमीवर संपूर्णतः सुरक्षित मत्तेची विक्री करण्यास स्वातंत्र्य असेल. कृपया नोंद घ्यावी की, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(१३) नुसार, तुम्हा सर्वांना कंपनीच्या पूर्व-लेखी परवानगीशिवाय पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यखेरीज हस्तांतरणापासून प्रतिबंध करण्यात आले आहे. तुमच्याकडून उक्त सेक्शन्सचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन झाल्यास तुम्हास सरफेसी ॲक्टच्या सेक्शन २९ अंतर्गत आणि/ किंवा या संबंधित कोणत्याही अन्य विधि तरतुदींच्या अनुसार दंडात्मक कारवाईस तोंड द्यावे लागेल. कृपया नोंद घ्यावी की ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) नुसार, जर "एबीएचएफएल"द्वारा निघालेली सर्व किंमत, आकार व खर्चासह एकत्रित "एबीएचएफएल"च्या देणींचे विक्री किंवा हस्तांतरणाकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळेत प्रदान केल्यास "एबीएचएफएल"द्वारा सुरक्षित मत्तेची विक्री केली जाणार नाही, आणि "एबीएचएफएल"द्वारा सुरक्षित मत्तेच्या हस्तांतरण किंवा विक्रीकरिता कोणतेही पुढील पाऊल उचलले जाणार नाही.

दिनांक : २८.०६.२०२४
स्थळ : औरंगाबाद

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
(आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

Classifieds

शैक्षणिक विशेष

शैक्षणिक

सुवर्णसंधी! बी.ए. व्हा! 10/12वी, पास/नापासांना प्रवेश. सरकारमान्य समकक्ष पदवी. डॉ.कानडे, 45 आदित्य शगुन मॉल, बावधन, पुणे. (वेळ स.11 ते 5). 9890344036/ 9890976469.

0090353071-1

विवाहविषयक

मॅरेज ब्युरो

।। पवित्र विवाह।। सौ. कुळकर्णी विवाहसंस्था. इंजिनीअर्स, डॉक्टर्स, CA, MBA, बँकर्स, सरकारी नोकरी, NRI, सुशिक्षित सर्व जातींच्या वधूवरांची भरपूर स्थळे. 8369692734/ 8450914835/ 9892625606.

0070856738-9

visit us at
WWW.LOKSATTA.COM

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तिंशेबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातींतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यान्वित करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.